# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:20.12.2024** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

- राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांच्या विरोधातील अविश्वास प्रस्ताव उपाध्यक्षांनी फेटाळला
- संसदेच्या आवारात झालेल्या धक्काबुक्की प्रकरणी भाजपा आणि कॉंग्रेसकडून परस्परविरोधी गुन्हे दाखल
- महाराष्ट्र विधानपरिषदेचे एकोणीसावे सभापती म्हणून प्राध्यापक राम शिंदे यांची एकमताने निवड
- नायजेरियात, बालजत्रेत झालेल्या चेंगराचेंगरीत 35 बालकांचा मृत्यू

आणि

- भारत आणि पाकिस्तान क्रिकेट संघादरम्यानचे आगामी दोन वर्षांतील सर्व सामने त्रयस्थ देशात खेळवण्याचा आयसीसीचा निर्णय

**धनखड अविश्वास**

उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांच्या विरोधात सभागृहात मांडण्यात आलेला अविश्वास ठराव उपाध्यक्ष हरिवंश यांनी काल फेटाळून लावला. धनखड पक्षपातीपणे काम करत असल्याचा आरोप करत विरोधी पक्षांनी त्यांच्या विरोधात अविश्वास ठराव मांडला होता. उपराष्ट्रपती धनखड यांची प्रतिष्ठा डागाळण्याच्या हेतूनं घाईनं केलेली ही कृती अयोग्य असून त्यामध्ये अनेक चुका असल्याचं हरिवंश यांनी ठराव फेटाळताना म्हटलं.

**संसद**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या विधानावरुन काल सलग दुसऱ्या दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ झाला. त्यामुळे दोन्ही संभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्यसभेत या आणि इतर विषयावरुन विरोधी पक्ष सदस्यांनी दिलेले स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळले. गोंधळ आणि घोषणा चालूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**भाजपा निदर्शनं**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या समर्थनार्थ तसंच काँग्रेसनं बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान केल्याचा आरोप करत भाजप खासदारांनी काल संसदेच्या आवारात निदर्शनं केली. तर शहा यांनी माफी मागावी, अशी मागणी करत विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसद परिसरात मोर्चा काढला. या निदर्शनांमध्ये धक्काबुक्की होऊन भाजपाचे प्रताप सरंगी आणि मुकेश राजपूत हे दोन खासदार जखमी झाले. या धक्काबुक्कीत आपल्यालाही इजा झाल्याचं कांग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं. या प्रकरणी भाजपा आणि काँग्रेसने परस्परांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत.

**अमित शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर जात आहेत. उद्या सिलिगुडी इथे सशस्त्र सीमा बलाच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत.

**शिंदे निवड**

महाराष्ट्र विधानपरिषदेचे एकोणीसावे सभापती म्हणून प्राध्यापक राम शिंदे यांची काल एकमताने निवड करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे शिंदे यांना सभापतीच्या आसनापर्यंत सन्मानपूर्वक घेऊन गेले. विधानपरिषदेच्या सभापतीपदी विधानपरिषद सदस्य प्राध्यापक राम शिंदे यांच्या नावाचा प्रस्ताव सदस्य श्रीकांत भारतीय, उमा खापरे आणि शिवाजीराव गर्जे यांनी मांडला. त्याला सदस्य मनीषा कायंदे, सदस्य अमोल मिटकरी आणि सदस्य ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी अनुमोदन दिले. उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी शिंदे यांचा परिचय करून दिला.

**वायकर**

यावर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत वायव्य मुंबई मतदारसंघातून निवडून आलेल्या शिवसेनेच्या रवींद्र वायकर यांच्या खासदारकीला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं होतं; त्या संदर्भातील याचिका काल न्यायालयानं फेटाळून लावली. मतमोजणीवेळी तथाकथित वादग्रस्त मतं वायकर यांना कशी मिळाली, हे सिद्ध करायला प्रतिस्पर्धी उमेदवार अमोल कीर्तीकर अपयशी ठरले आहेत, त्यामुळे कीर्तीकर यांच्या याचिकेवर सुनावणी घेता येणार नाही, असं न्यायालयानं म्हटलं आहे.

**परीक्षा पे चर्चा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून दर वर्षी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असतात. या कार्यक्रमाचा आठवा भाग पुढील महिन्यात अर्थात जानेवारी 2025 मध्ये सादर होणार आहे. या संवादात्मक कार्यक्रमासाठी नोंदणी सुरू झाली असून, 14 जानेवारीपर्यंत MyGov पोर्टलवर नोंदणी करता येईल. परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी आणि विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना जीवन एक उत्सव म्हणून साजरे करण्यासाठी प्रोत्साहित करणे ही या कार्यक्रमाची संकल्पना आहे.

**पुतीन-युद्धविराम**

अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी होणाऱ्या प्रस्तावित चर्चेदरम्यान यूक्रेनबरोबरचं युद्ध थांबवून तोडगा काढण्यासंदर्भात चर्चा करण्यास तयार असल्याचं रशियाचे अध्यक्ष व्लादीमीर पुतीन यांनी म्हंटलं आहे. यासाठी, यूक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांच्यासह कोणत्याही यूक्रेनियन अधिकाऱ्यांशी बिनशर्त वाटाघाटी करण्यास तयार असल्याचं पुतीन यांनी काल प्रसारमध्यमांशी बोलताना सांगितलं. तथापि, वाटाघाटीच्या करारांवर, यूक्रेन संसदेचे सदस्य म्हणून रशियाने मान्यता दिलेल्या अधिकृत अधिकाऱ्यांनीच स्वाक्षरी केली पाहिजे अशी आग्रही भूमिका पुतीन यांनी यावेळी मांडली. दरम्यान हा युद्धसंघर्ष लवकरात लवकर संपवण्याचं आश्वासन ट्रम्प यांनी दिलं असलं, तरीही याबाबतची आपली भूमिका अद्याप स्पष्ट केलेली नाही.

**नायजेरिया**

नायजेरियामधील इबादान शहरात ख्रिसमसनिमित्त आयोजित बालजत्रेत झालेल्या चेंगराचेंगरीत 35 मुलांचा मृत्यू झाला असून सहा जण गंभीर जखमी झाल्याचं वृत्त आहे. एका शाळेत आयोजित या कार्यक्रमात रोख रक्कम आणि खाऊ वाटपाचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यात सुमारे 5 हजार मुलं सहभागी झाली होती. नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष बोला टिनुबू यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून या दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

**कांदा निर्यात**

केंद्र सरकारनं कांदा निर्यातीवर लावलेलं 20 टक्के शुल्क तातडीनं रद्द करण्याची मागणी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय व्यापार आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. श्रीलंका सरकारनं कांद्यावरील आयातशुल्क 20 टक्क्यांनी कमी करून अधिकाधिक कांदा आयातीचे प्रयत्न सुरू केले असल्यानं नाशिकसह राज्यातील शेतकऱ्यांना त्यांचा लाल कांदा श्रीलंकेसह परदेशांमध्ये निर्यात करता यावा, कांद्याला खर्चावर आधारित चांगला दर मिळावा, यासाठी केंद्र सरकारनं कांद्यावरील 20 टक्के निर्यातशुल्क तातडीनं रद्द करणं आवश्यक असल्याचं उपमुख्यमंत्री पवार यांनी गोयल यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

**रत्नागिरी-एनटीपीसी-वसाहत**
महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन अर्थात NTPC च्या वसाहतीने, भारतीय हरित इमारत परिषद अर्थात IGBC चं जलस्रोत व्यवस्थापनातील प्रशस्तीपत्र मिळवलं आहे. हा मान मिळविणारी भारतातील ही पहिली टाऊनशिप आहे. या वसाहतीने शाश्वत जलस्रोत व्यवस्थापनामध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. यात, पावसाच्या पाण्याची साठवणूक, सांडपाण्याचा कार्यक्षम पुनर्वापर आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाद्वारे पाण्याचा कमी वापर करणे यांचा समावेश आहे.

**कुर्ला-बसदुर्घटना**
मुंबईत गेल्या आठवड्यात कुर्ला इथं झालेल्या बस दुर्घटनेतील मृतांची संख्या वाढून 9 झाली आहे. या दुर्घटनेत गंभीर जखमी झालेल्या एका तरुणाचा रुग्णालयात उपचारादरम्यान काल मृत्यू झाला.

**अपघात**
मुंबईतील गेटवे ऑफ इंडियापासून घारापुरी बेटांकडे जाणारी बोट उलटून झालेल्या अपघातातील मृतांची संख्या तेरा झाली असून बेपत्ता असलेल्या दोघांचा शोध सुरु आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेतल्या मृतांच्या वारसांना प्रत्येकी दोन लाख तर जखमींना पन्नास हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतांच्या वारसांना पाच लाख रुपये मदत जाहीर केली आहे.

**स्थगन प्रस्ताव**
दरम्यान, या दुर्घटनेचे पडसाद काल महाराष्ट्र विधानसभेत उमटले. मुंबईत नुकत्याच झालेल्या बोट दुर्घटनेत 110 प्रवाशांपैकी 96 प्रवाशांना सुरक्षित वाचवण्यात आलं असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.

**वानखेडेमैदान-सुवर्णमहोत्सव**
मुंबईतील वानखेडे मैदानाचा सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन येत्या जानेवारी महिन्यात आहे. या निमित्त, 12 ते 19 जानेवारी दरम्यान विशेष कार्यक्रम आयोजित करणार असल्याची घोषणा, महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी काल झालेल्या पत्रकार परिषदेत केली. या औचित्याने एका विशेष बोधचिन्हाचं अनावरणही यावेळी करण्यात आलं. अनेक ऐतिहासिक सामन्यांचा साक्षीदार असलेल्या या मैदानाची उभारणी 1974 साली करण्यात आली. जगातील सर्वात प्रतिष्ठित क्रिकेट मैदानांमधे वानखेडे मैदानाची गणना होते.

**भारत-पाकसामने**
पुढील वर्षी पाकिस्तानात होणाऱ्या चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेचे सामने त्रयस्थ ठिकाणी खेळवले जातील असं भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात आय सी सी ने स्पष्ट केलं आहे. तसंच येत्या 2025 ते 2027 या कालावधीत, भारत आणि पाकिस्तान क्रिकेट संघादरम्यान होणारे सर्व सामने त्रयस्थ देशात खेळवले जातील. यात, 2025 मध्ये भारताने आयोजित केलेल्या ICC महिला क्रिकेट विश्वचषक आणि श्रीलंकेत होणाऱ्या पुरुषांच्या वीस षटकांच्या चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धांचा समावेश आहे.

**क्रिकेट**
महिलांच्या वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारतानं वेस्टइंडिजचा तिसऱ्या सामन्यात 60 धावांनी पराभव करत ही मालिका 2-1 अशी जिंकली. नवी मुंबईत झालेल्या या सामन्यात भारतीय महिलांनी टी-ट्वेंटीमधील आजवरची सर्वाधिक 217 धावसंख्या उभारली. स्मृती मंधनानं 77 तर रिचा घोषनं 54 धावा केल्या. रिचानं केवळ 18 चेंडूत पन्नास धावा काढून विक्रम केला, ती सामनावीर ठरली. उत्तरादाखल वेस्टइंडीज संघ 20 षटकात 9 बाद 157 धावाच करु शकला. स्मृती मंधनाला मालिकावीर पुरस्कार देण्यात आला. उभय संघांमध्ये पन्नास षटकांची मालिका परवा 22 तारखेपासून सुरु होत आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**